**नि. दि. दावा क्र.४/२०१७**
**नामदेव वि. अतिष**
**नि.क्र.११३**

**प्रतिवादीतर्फे स.क्र.३**

**नावः दिलीप भोलाजी उमरेडकर,**

**वयः ५९ वर्ष, व्यवसायः शाखा प्रबंधक,**

**पत्ताःबँक ऑफ इंडीया,डोंगरगाव,**

**प्रतिवादी तर्फे साक्षदार क्र.३ यांचा सरतपास ए.जे. मुलमुले साहेबः**

**१.** दिनांक ०४/१०/२०२१ मी डोंगरगाव येथील शाखेत प्रबंधक म्हणून कार्यरत आहे. न्यायालयाच्या साक्ष समंस प्रमाणे मी आज रोजी कागद पेश केले आहे. मी आधार कार्ड व बँकेचे ओळखपत्र याची प्रमाणित प्रत दाखल केले आहे. आता मला नि.११२ यादीसोबत दाखल केलेले कागदपत्र दाखवण्यात आले. अ.क्र.१ ला माझ्या आधार कार्डची प्रमाणित प्रत **नि.क्र.११४** देण्यात येत आहे. अ.क्र.२ ला बँकेचे ओळखपत्राची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.११५** देण्यात येत आहे. अ.क्र.३ वर अतिष ठाकुर याचे दि.०५/०५/२०१५ ते २५/०५/२०१५ याकालावाधीतील बँकेचा खाते उता–याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.११६** देण्यात येत आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास वादीतर्फे श्री एम.डी. पालीवाल वकील साहेबः**

**२.** मी आज रोजी शाखा डोंगरगाव येथे कार्यरत असल्याबाबतचा पुरावा दाखल केला आहे. नि.क्र.११६ वरील खातेउतारा हा सिस्टीम जनरेट आहे त्यामुळे तोच मुळ रेकार्ड समजला जातो. बँकेचे वॅबसाईट हॅक होतात. हे म्हणणे खरे नाही की, बँक वॅबसाईट हॅक

झाल्यामुळे सिस्टीममध्ये जावुन अफरातफर करुन अभिलेख बदले जावु शकते. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.११६ वरील खातेउतारा मुळ अभिलेखाप्रमाणे जसाचातसा असल्याबाबतचा पुरावा उपलब्ध नाही. इलॅक्ट्रानिक कागदपत्र शाबीत करण्याची कार्यपध्दती मला माहीत नाही. मी भारतीय पुरावा अधिनियम कलम ६५ (बी) प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.११६ वरील खातेउतारा मुळ अभिलेखाप्रमाणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.११६ मधील मजकुर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास– नाही.

**श्रवणोत्तर स्विकृती,**

**(ओ.जे. कुलकर्णी)**
**दि.न्यायाधिश क.स्तर,पारशिवनी**
**दिनांकः०१/०४/२०२४**

**समक्ष,**

**(ओ.जे. कुलकर्णी)**
**दि.न्यायाधिश क.स्तर,पारशिवनी**